# १८. विविध रेचकांविषयी माहिती

(पचन संस्थेचे साधे आजार)

| नाव | कसे काम करते | किती वेळात परिणाम | प्रौढांसाठी डोस |
|---|---|---|---|
| १.त्रिफळा चूर्ण | आतड्यात पाणी शोषून फुगते आणि त्यामुळे पुढेपुढे ढकलले जाते | ६–८ तास | रात्री १–२ मोठे चमचे गरम पाण्याबरोबर घ्यावे. |
| २.सेन्ना | मोठ्या आतडयाला चालना देते | ६–८ तास | पाण्याबरोबर १–२ गोळ्या |
| ३.एरंडेल तेल | आतड्यांना जास्त जुलाब होतात | ३–६ तास | ३० मि.ली.(बाळांना आणि गरोदर स्त्रियांना देऊ नये) |
| ४.मॅग्नेशियम सल्फेट | रक्तातून आतड्यात पाणी खेचते, त्यामुळे मळ पातळ व जास्त होतो, एक किंवा दोन मोठे जुलाब होतात. (मूत्रपिंडविकारात देऊ नये) | ३–६ तास | ५–१५ ग्रॅम, १ ग्लास पाण्याबरोबर (याऐवजी २० मि.ली मिल्क ऑफ मॅग्नेशिया चालेल. |
| ५.बिसकोडील (डल्कोलॅक्स) | मोठ्या आतड्यास चालना देते. १–२ मोठे जुलाब होतात. | तोंडाने दिल्यास ८ तासात, गुदद्वाराने दिल्यास १५ मिनिटात | १ गोळी तोंडाने (५ मि.ग्रॅ) पाण्याबरोबर किंवा १० मिग्रॅ. ची गुदद्वार गोळी. |
| ६.पॅराफिन | (पातळ)आतड्यांना वंगण होते, मळ मऊ होतो व सरकतो (पॅराफिन पचत नाही) | ६–८ तास | १०–३० मिली झोपताना. (मुलांना नकोच, मोठ्यांनाही वारंवार नको). |
| ७.गोडतेल किंवा खोबरेल तेल | पॅराफिनप्रमाणेच काम करते, मात्र काही भाग पचतो, त्यामुळे डोस जास्त द्यायला लागतो. | ६–८ तास | ३०–५०मि.ली. झोपताना |
| ८.इसबगोल. | पाण्याने फुगते, त्यामुळे ढकलले जाते. सबजापण असेच काम करतो. | १२–३६ तास | ५–१५ ग्रॅम कोमट पाण्याबरोबर |
| ९. ग्लिसरिन | मळ मऊ करते | १ तासात | गुदद्वारातून पिचकारी किंवा गोळी रुपात घालावे. |
| टीप १. लहान बाळांना रेचकाची गरज नसते, एरंडेल तर नकोच नको. वाटल्यास गुदद्वारामार्फत तेल/पॅराफिन/ग्लिसरीन द्यावे.<br>२. जंतासाठी औषधे देताना रेचकाची गरज नसते.<br>३. एनिमासाठी तयार पॅक मिळतात. | | | |